।। हरि ॐ ।।    ।। श्रीराम ।।    ।। अंबज्ञ ।।

# त्रिविक्रमाची १८ वचने

दत्तगुरुकृपे मी सर्वसमर्थ तत्पर ।
श्रद्धावानास देईन सदैव आधार ।।१।।

मी तुम्हांसी सहाय्य करीन निश्चित ।
मात्र माझे मार्ग त्रि-नाथांसीच ज्ञात ।।२।।

धरू नका जराही संशय याबाबत ।
न होऊ देईन तुमचा मी घात ।।३।।

प्रेमळ भक्ताचिया जीवनात ।
नाही मी पापे शोधीत बसत ।।४।।

माझिया एका दृष्टिपातात ।
भक्त होईल पापरहित ।।५।।

माझ्यावरी ज्याचा पूर्ण विश्वास ।
त्याच्या चुका दुरुस्त करीन खास ।।६।।

तैसेचि माझ्या भक्तां जो देई त्रास ।
सजा मी नक्कीच देईन त्यास ।।७।।

माझिया भक्तांचे कुठलेही प्रारब्ध ।
बदलीन, तोडीन वा घालीन बांध ।।८।।

न येऊ देता जगदंबेच्या नियमास बाध ।
दु:खातून काढूनी बाहेर, मार्ग दावीन अगाध ।।९।।

सदैव मी तुमचा उगवता देव ।
नाही मावळणार, सौम्य करीन दैव ।। १० ।।

पूर्ण श्रद्धेने करा नवस, करा भक्ती गाळा घाम ।
पावेन तुमच्या श्रद्धेनुसार, मी सर्वकाळ सुखधाम ।।११।।

सर्व मार्गांमध्ये, मज असे भक्ती प्रिय ।
जन्म-जीवन-मृत्यू तुमचे काहीही न व्यर्थ जाय ।।१२।।

शरणागत होऊनी करी जो गजर ।
त्याचिया जीवनी सुख अपरंपार ।।१३।।

माझिया भक्तीपासून, कोण तुम्हांस रोखेल? ।
कामक्रोध जरी असले भरून, माझे नाम माझिया भक्तास तारेल ।।१४।।

प्रेमे जो माझे घेई नाम, त्याचे काम सर्व पुरवीन ।
संपन्न करीन त्याचे धाम, भरीन शांती समाधान ।।१५।।

माझ्या चरणांचिया नि:शंक ध्याने ।
सहस्रकोटी संकटे पळती भयाने ।।१६।।

खरा भक्त राही, दोन चरणांत माझ्या ।
तिसरे पाऊल माझे तुडवील संकटास तुमच्या ।।१७।।

जेथे भक्ती पूर्ण श्रद्धा व प्रेम ।
तेथे तेथे कर्ता मी त्रिविक्रम ।। १८ ।।

अनिरुद्ध

।। हरि ॐ ।। ।। श्रीराम ।। ।। अंबज्ञ ।।